Literacy for a Billion

Movie: Mee Shivajiraje Bhosale Boltoy
Year: 2009

Song: Jay He Maharashtra Desha

Lyricist: Shrirang Godbole

कंठातूनी लक्ष हुंकार झंकारूनी
होऊ द्या गर्जना
आकाश भेदूया
जयघोष हा करूनी
देऊया वंदना
मराठी मातीला
मर्दांच्या मातेला
देई आम्हाला जी प्रेरणा
अंगार हा फुटे नेत्रातूनी
नसा-नसांत चेतना
कल्लोळ हा उठे देहातूनी
जय हे महाराष्ट्र देशा

दोस्तीमध्ये दोस्त आम्ही
देऊ प्राणांचीही कुर्बानी
गद्दार त्या दुश्मनाचा
करू निःपात
अन् पाजू पाणी
मी मराठी हो हो
जो म्हणे तो हो हो
भाऊ रक्ताचा होऊन गेला हा
दिलदारी हो हो
मी मराठी हो हो
आपले मानू
तो आपुलाच झाला
हा...

अंगार हा फुटे नेत्रातूनी
नसा-नसांत चेतना
कल्लोळ हा उठे देहातूनी
जय हे महाराष्ट्र देशा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*